# 'राष्ट्रीय कौशल्ये विकास'च्या संचालकपदी जितेंद्र ठक्कर

प्रतिनिधी | नाशिक

नाशिक येथील ठक्कर्स डेव्हलपर्स लिमिटेडचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांची केंद्रीय अर्थ मंत्रालयाअंतर्गत काम करणाऱ्या राष्ट्रीय कौशल्ये विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर २०१५-१७ या आर्थिक वर्षासाठी संचालक म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.



खास बांधकाम क्षेत्रासाठी स्थापन केलेल्या कन्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेत कार्य करण्यासाठी या क्षेत्रातून देशभरातून १५ संचालक म्हणूनही वेगळी नियुक्ती करण्यात आली आहे. देशातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये कौशल्येप्राप्त मनुष्यबळाची असलेली वाढती गरज भागविणे आणि येथील विविध कौशल्यांची मागणी आणि पुरवठा यातील सध्याची दरी कमी करणे, या उद्देशाने राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ कार्य करीत आहे. या दोन्ही नेमणुकांसाठी ठक्कर यांचे नामांकन करण्याचा निर्णय क्रेडाईच्या अखिल भारतीय संघटनेच्या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नवी दिल्ली येथे झालेल्या पदग्रहण कार्यक्रमप्रसंगी जाहीर करण्यात आला.